डॉ. विनोद पाटील
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

(MU Exam Mission – 2020)

**मुंबई विद्यापीठ**
महात्मा जोतिबा फुले भवन
परीक्षा विभाग, सांताक्रुझ (पू)
मुंबई ४०००९८

# परिपत्रक

No. Exam/DBOEE/ICC/2020-21/16

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम सत्र (हिवाळी) परीक्षेच्या आयोजनाबाबत.**
**संदर्भ : No. Exam/DBOEE/ICC/2020-21/15, दिनांक १८/११/२०२०**

उपरोक्त नमुद विषयाच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, एमसीए, आर्किटेक्चर व फार्मसी) महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम सत्र (हिवाळी) परीक्षेच्या आयोजना संदर्भात उपरोक्त संदर्भाकिंत परीपत्रकान्वये संबधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात आले होते यात व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, एमसीए, आर्किटेक्चर व फार्मसी) बाबतीत खालील प्रमाणे बदल करण्यात आलेले असुन संबधितांनी त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक १५ जानेवारी, २०२१ पर्यंत घेण्यात याव्यात. (प्रथम वर्ष (प्रथम सत्र) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या तारखा स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येतील.)
पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या बाबतीत स्वतंत्र परीपत्रक निर्गमित करण्यात येईल.

व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, एमसीए व फार्मसी) परीक्षेसाठी ८० गुणांची ऑनलाईन थेअरी परीक्षा घेण्यात यावी. थेअरी परीक्षेमध्ये ४० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) ४० मिनिटांची घेण्यात यावी व ४० गुणांची वर्णनात्मक थेअरी परीक्षा (Descriptive Type Exam) ८० मिनिटांची घेण्यात यावी अशी एकुण २ तासांची परीक्षा घेण्यात यावी.

परीक्षेचे मुल्यांकन ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावे. शिक्षकांनी परीक्षेचे मुल्यांकन ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयातच (College Computer Lab) करावे.

आर्किटेक्चर शाखेच्या परीक्षेसाठी २० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) ३० मिनिटांची घेण्यात यावी व ३० गुणांसाठी ऑनलाईन वर्णनात्मक ( descriptive / questions for diagrams or sketches) परीक्षा १ तासाची घेण्यात यावी. अशी एकुण १ तास ३० मिनिटांची परीक्षा घेण्यात यावी.

उर्वरीत कार्यवाही उपरोक्त नमुद संदर्भीय परीपत्रका प्रमाणे करण्यात यावी.

**ठिकाण : मुंबई -४०००३२**
**दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२०**

**(डॉ. विनोद पाटील)**
**संचालक**
**परिक्षा व मुल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१ मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / संचलित विविध व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, एमसीए, आर्किटेक्चर व फार्मसी) महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.
२ स्वीय सहाय्यक: १)कुलगुरु २)प्र—कुलगुरु ३)कुलसचिव ४)संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ